File No.PBN-15012(14)/4/2019-PBN-HOME-COLLECTOR OFFICE-PARBHANI

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

## (गृह विभाग कायदा व सुव्यवस्था)

**Email ID : rdcparbhani@gmail.com** **दुरध्वनी (02452) 223702 फॅक्स (223774)**

---

**वाचा** :- 1. मा.उच्च न्यायालय आदेश क्र. पीआयएल 173/2010 सह सिव्हील ॲप्लीकेशन क्र. 124/2014 व मा.उच्च न्यायालयाने दिलेले दि.10, 11, 12 व दि. 16.08.2016 रोजीचे आदेश.
2. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक दि. 06.07.2015 व दि. 06.07.2016
3. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-2016/प्र.क्र.127(भाग-1)/नवि-17 दि. 06 मार्च 2017
4. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे पत्र दि. 21.06.2017
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2017/गृह/अे-1/पोल/सिआर-20 दि.05.09.2018

---

जा.क्र.2017/गृह/अे-1/पोल/सिआर-20 दिनांक : 19.08.2019

:: **आ दे श** ::

ज्याअर्थी जनहित याचिका क्रमांक 173/ 2010 संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक 10,11,12 व 16 ऑगस्ट 2016 रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगर पालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण / उत्सव / समारंभ यासाठी उभारण्यात येणा-या मंडप / पेंडॉल तपासणीबाबत संबंधीत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तहसिलदार अथवा त्यावरील अधिका-यांच्या गठित करण्यात आलेल्या मंडप तपासणी पथकामार्फत सार्वजनिक उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी पुरेशा कालावधी अगोदर मंडप/पेंडॉल तपासणी होणे, त्यासंदर्भातील वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल संबंधित सक्षम प्राधिका-यांकडे आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करणे, इत्यादी कार्यवाही अधिक प्रभावीपणे होण्यासाठी प्रत्येक महानगर पालिकेकरिता जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकानिहाय मंडप / पेंडॉल तपासणी संनियंत्रण समिती गठित करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

**त्याअर्थी सन 2019 साठी परभणी जिल्हयातील परभणी महानगरपालिका क्षेत्रांकरिता जिल्हानिहाय संनियंत्रण समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.**

1. श्रीमती डॉ.सुचिता शिंदे, उप विभागीय अधिकारी, परभणी - **अध्यक्ष**
2. श्री जी.व्ही.जाधव, उप आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी - **सदस्य**
3. श्री.संजय परदेशी, उपविभागीय पोलिस अधिकारी (शहर), परभणी - **सदस्य**

उपरोक्त नियुक्त समितीने शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-2016/प्र.क्र.127(भाग-1)/नवि-17 दि. 06 मार्च 2017 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करून विहित नमून्यातील अहवाल वेळोवेळी शासनास व या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होणार नाही, याबाबत आवश्यकती दक्षता मंडप तपासणी संनियंत्रण समितीने घ्यावी. याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी मंडप तपासणी संनियंत्रण समितीची राहिल.

(Digitally Sign)

**( पी.शिवशंकर )**

**जिल्हादंडाधिकारी परभणी**

File No.PBN-15012(14)/4/2019-PBN-HOME-COLLECTOR OFFICE-PARBHANI

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी**

**(गृह विभाग कायदा व सुव्यवस्था)**

**Email ID : rdcparbhani@gmail.com** **दुरध्वनी (02452) 223702 फॅक्स (223774)**

---

जा.क्र.2017/गृह/अे-1/पोल/सिआर-20 दिनांक : 19.08.2019

**विवरणपत्र क्रमांक १**

**मंडप / पेंडॉल तपासणी पथकांबाबत प्रसिद्धीपत्रक**

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे उपस्थित जनहित याचिका क्र. १७३/२०१० संदर्भात सार्वजनिक सण / उत्सव / समारंभ याप्रसंगी उभारण्यात येणा-या मंडप / पेंडॉलच्या तपासणीच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार परभणी जिल्ह्यांतर्गत परभणी महानगरपालिका / हद्दीमधील मंडप / पेंडॉल तपासणी करण्याबाबत खालीलप्रमाणे तपासणी पथक/पथके गठित करण्यात आलेले आहेत. सदर तपासणी पथकांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपासणी पथक सदस्याचे नांव | पदनाम | कार्यालयीन दुरध्वनी क्र. | मोबाईल क्रमांक / व्हाट्स अप क्र. | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती डॉ.सुचिता शिंदे | उप विभागीय अधिकारी, परभणी | (02452) 226537 | 9175063310 | sdoparbhani @yahoo.com |
| 2 | श्री जी.व्ही.जाधव | उप आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी | (02452) 223638 | 9765112277 | pmcparbhani @yahoo.in |
| 3 | श्री.संजय परदेशी | पोलीस उपअधिक्षक (शहर), परभणी | (02452) 222512 | 8308791626 | pbnsdpocity@ mahapolice.gov.in |

तरी, नागरिकांनी सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ याप्रसंगी उभारण्यात येणा-या मंडप/पेंडॉलच्या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास उपरोक्त विवरणपत्रामधील नमूद तपासणी पथक सदस्यांशी संपर्क साधावा.

(Digitally Sign)

**( पी.शिवशंकर )**

**जिल्हादंडाधिकारी परभणी**

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.08.29 15:03:20 IST
Reason: Approved

**File No.PBN-15012(14)/4/2019-PBN-HOME-COLLECTOR OFFICE-PARBHANI**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी**

**(गृह विभाग कायदा व सुव्यवस्था)**

**Email ID : rdcparbhani@gmail.com** **दुरध्वनी (02452) 223702 फॅक्स (223774)**

---

**जा.क्र.2017/गृह/अे-1/पोल/सिआर-20** **दिनांक : 19.08.2019**

**प्रति,**

**तालुका दंडाधिकारी,**
**परभणी / पूर्णा / पालम / गंगाखेड / सोनपेठ / मानवत / पाथरी / सेलू / जिंतुर.**

**विषय :- जनहित याचिका क्र. १७३/२०१०.**
**डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर (मंडप (पेंडॉल) तपासणीबाबत)**

**संदर्भ** :- 1. मा.उच्च न्यायालय आदेश क्र. पीआयएल 173/2010 सह सिव्हील ॲप्लीकेशन क्र. 124/2014 व मा.उच्च न्यायालयाने दिलेले दि.10, 11, 12 व दि. 16.08.2016 रोजीचे आदेश.
2. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक दि. 06.07.2015 व दि. 06.07.2016
3. शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र-2016/प्र.क्र.127(भाग-1)/नवि-17 दि. 06 मार्च 2017
6. या कार्यालयाचे आदेश दि. 19.08.2017

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी ध्वनी प्रदुषण नियम 2000 व रस्त्यावर / पदपथावर / पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरूपात मंडप वा तत्सम रचना उभारण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.173/2010 प्रकरणी दिलेल्या विस्तृत निकालाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संदर्भिय शासन निर्णय / परिपत्रकान्वये सुचना दिलेल्या आहेत.

जनहीत याचिका क्र.173/2010 डॉ.महेश बेडेकर विरुदध महाराष्ट्र शाासन व इतर या न्यायालयीन प्रमरणी ध्वनी प्रदुषण नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च् न्यायालय यांनी आदेश पारीत केले असुन सदर आदेशातील परिच्छेद क्र.94 मधील मुदयांचे अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विभागाने सदर मुदयांबाबत तात्काळ कार्यवाही करणे बाबत निर्देश दिले आहेत.तसेच ध्वनी प्रदुषण नियम 2000 च्या अनुपालनासंदर्भात व अनाधिकृत मंडप वा तत्सम रचना उभारण्यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे आदेश दिनांक 19.08.2017 अन्वये आपली तालुकास्तरीय समितीमध्ये अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

करिता आगामीकाळात पार पडणा-या गणेशोत्सव, नवरात्र, दहीहंडी व इतर धार्मिक सणांच्या अनुषंगाने अनाधिकृत मंडप उभारण्यासंदर्भात तसेच ध्वनी प्रदुषण विषयक नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त संदर्भिय नमूद अधिसुचना / न्यायालयीन आदेश / शासन निर्णय / परिपत्रके / या कार्यालयातील आदेश यांचे अवलोकन करून आवश्यक ती उचित कार्यवाही विहित मुदतीत पार पाडावी. तसेच वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.08.29 1[illegible]:02:14 IST
Reason: Approved

(Digitally Sign)
**( पी.शिवशंकर )**
**जिल्हादंडाधिकारी परभणी**

File No.PBN-15012(14)/4/2019-PBN-HOME-COLLECTOR OFFICE-PARBHANI
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी**
**(गृह विभाग कायदा व सुव्यवस्था)**
**Email ID : rdcparbhani@gmail.com** **दुरध्वनी (02452) 223702 फॅक्स (223774)**

---

जा.क्र.2017/गृह/अे-1/पोल/सिआर-20 दिनांक : 19.08.2019

**प्रति,**

1. **श्रीमती डॉ.सुचिता शिंदे,**
   उपविभागीय अधिकारी, परभणी तथा मंडप / पेंडॉल तपासणी संनियंत्रण समिती प्रमुख, परभणी
2. **श्री.विद्याचरण कडवकर,**
   तहसिलदार परभणी तथा मंडप / पेंडॉल तपासणी पथक प्रमुख, परभणी

**विषय :-** **जनहित याचिका क्र. १७३/२०१०.**
**डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर**
**(ध्वनी प्रदूषण नियम 2000 व अनधिकृत मंडप उभारण्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत)**

**वाचा** :- श्री कि.पां.वडते,उपसचिव,महाराष्ट्र शासन,महसुल व वन विभाग,मंत्रालय मुंबई-३२ यांचे पत्र क्र.संकीर्ण /२०१५/प्रक्र१०/म-६ दिनांक ०१.०८.२०१८ व ०५.०९.२०१८

विषयांकीत प्रकरणी संदर्भिय नमूद पत्रान्वये मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंडप तपासणीची प्राथमिक जबाबदारी महसूल अधिका-यांची असून त्यांच्या अहवालाप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही संबंधीत महानगरपालिका अधिका-यांकडून करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. परंतू सदर अहवाल किमान 3 दिवस अगोदर प्राप्त न झाल्यास या प्रकरणी उचित कार्यवाही करता येत नाही असे काही महानगरपालिकांकडून मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असल्याचे कळविले आहे.

यास्तव प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जिल्हाधिका-यांकडून नियुक्त केलेल्या महसूल अधिका-यांनी प्रत्यक्ष सण/समारंभाच्या आधी किमान 7 दिवस मंडप तपासणी करावी व त्याबातचा अहवाल संबंधीत महानगरपालिकेस किमान 3 दिवस अगोदर सादर करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण / उत्सव / समारंभ यासाठी उभारण्यात येणा-या मंडप / पेंडॉल तपासणीबाबतचा अहवाल विहीत विवरणपत्रात विना विलंब सादर करावा.

वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यास मा.उच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता असून त्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(Digitally Sign)
**( पी.शिवशंकर )**
**जिल्हादंडाधिकारी परभणी**

प्रतिलिपी :

1. आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
2. पोलिस अधिक्षक,परभणी यांना माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.08.29 15:03:52 IST
Reason: Approved